ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# अण्णाभाऊ साठे - एक साहित्यरत्न

**डॉ. हरिश्चंद्र मधुकर गायकवाड**
**मराठी विभाग प्रमुख,**
**शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय, परंडा, ता. परंडा जि. उस्मानाबाद.**

## १. प्रास्ताविक



मराठी साहित्य एक अभिजात व समृध्द साहित्य म्हणून ओळखले जाते. अनेक अभिजात साहित्यकांनी त्यांच्या लेखनातून हे मराठी साहित्य उत्तुंग यशोशिखरावर नेवून ठेवले. ज्ञानेश्वर, मुकुंदराज ते आधुनिक साहित्य इथपर्यंतच्या लेखकांनी आपल्या लेखणीतून अजरामर कृती निर्माण केल्या. समाजाचे प्रतिबिंब, वेदना, संस्कार, अनेक लेखकांनी त्यांच्या कलाकृतीतून वाचकांसमोर आणल्या दलित साहित्याचा विचार केला तर नामदेव ढसाळ, बाबूराव बागूल इत्यादी लेखकांनी अन्यायाविरुध्द जनमानसात फुल्लींग चेतवले. या बाबतीत सर्वात अग्रणी आहेत ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आण्णाभाऊ साठे.

आण्णभाऊ साठे हे खरे साहित्यरत्न आहेत. आपल्या लेखणीतून त्यांनी समाज सुधारण्याचा व संघर्ष करण्याचा मूलमंत्र दिला. आण्णाभाऊ साठे यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्टया कृतीशीलतेवर आधारलेले होते. आण्णाभाऊ साठे हे मार्क्सवादी, आंबेडकरवादी विचारांचे होते. सुरुवातीला त्यांच्या लेखनीवर साम्यवादाचा प्रभाव होता पण नंतर ते आंबेडकरवादी झाले.

## २. मराठी साहित्य लेखन :-

शिक्षणाचा व लेखनाचा फारसा संबंध नसताना त्यांनी लेखन साहित्यामध्ये अनेक अजरामर कृती लिहिल्या त्यांनी विशेषतः कथा, कादंबरी, पोवाडे इत्यादी लेखनावर विशेष भर दिला. त्यांची जगप्रसिध्द साहित्यकृती म्हणून **फकिरा** या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या जीवनावर व साहित्यलेखनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीपाद अमृत डांगे, कार्ल मार्क्स यांचा प्रभाव होता.

भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते.

**| ये आझादी झूठी है, देश की जनता भूखी है |,**

असा त्यांचा संदेश होता. दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी त्यांनी आपले विचार मांडले आहेत. कामगार शक्तीचे महत्व सांगतानाच अंधश्रध्देला त्यांनी नाकारले आहे. ते म्हणतात - **पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसुन, ती कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे.**

आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखनात दलित व कामगार वर्ग, यांच्या अन्यायाला वाचा फोडली साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये **फकिरा** (१९५९) या कादंबरीचा विशेष उल्लेख करावा वाटतो. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार या कादंबरीस मिळाला.

आण्णाभाऊ साठे यांनी कादंबरी आणि लघुकथा या व्यतिरिक्त नाटक, पटकथा आणि पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

## ३. आण्णाभाऊ साठे यांच्या लेखन साहित्याची वैशिष्टये :-

१) साठेंच्या पोवाडा आणि लावणी सारख्या लोककथात्मक कथा शैलीच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले. त्यांचे लेखन कार्य सातासमुद्रापार गेले.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंझार लेखनीला अर्पण केलेल्या फकिरा या कादंबरीमधून आपल्या लेखनीतून आपल्या समुदायाला उपासमार, ग्रामीण रुढीवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुध्द विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले.

३) आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य समीक्षेतून असे दिसून येते की, ते जनवादी साहित्यिक होते. ते एक लोक लेखक होते.

४) उत्तम शाहीर म्हणून ते कमी कालावधीतच प्रचलित झाले. महाराष्ट्राची शाहिरी पारंपरा प्रदीर्घ व समृध्द आहे. अण्णाभाऊंनी ती परंपरा अधिक समृध्द व संपन्न केली. त्यांनी मराठी शाहीरीवर कळस चढवला.

५) पोवाडयाच्या माध्यमातून त्यांनी अनेक समस्यांना वाचा फोडली. **मुंबईचा गिरणी कामगार** हा पोवाडा तर गिरणी कामगारांचा प्रेरणास्त्रोत होता.

६) आण्णाभाऊंच्या साहित्यातून त्यांनी अनेक नायक उभे केले. ज्या नायकांनी अन्यायाच्या श्रृंखला तोडण्याचे काम कले, आवाहन केले.

७) अण्णाभाऊंच्या साहित्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा, कर्तुत्वाचा व तत्वज्ञानाचा फार मोठा पगडा जाणवतो, ते म्हणतात.

**| जग बदल घालुनी घाव| सांगून गेले मला भीमराव |**

८) आण्णाभाऊंचे समग्र साहित्य हे क्रांतिप्रवण आहे. त्यात लढाऊ बाणा आहे, अन्यायाविरुध्द लढण्याची ध्येयवादी दृष्टी आहे. कामगारांसाठी गरीबीसाठी तळमळ जाणवतो.

९) अण्णाभाऊ साठे हे हे एका ध्येयाने झपाटलेले लेखक होते. दु:ख, गरीबी, उपासमार, अन्याय ,संघर्ष , अज्ञान हेच त्यांच्या लेखनाचे विषय होते व त्यांनी अत्यंत प्रभावी शब्दात आपल्या साहित्यात मांडले.

## ४. समारोप :-

अण्णाभाऊ साठें यांचे लेखन साहित्य म्हणजे एक धगधगता अग्निकुंडच म्हणावा लागेल. त्यांनी आपल्या लेखनीतून अनेक अजरामर कृती मराठी साहित्याला दिल्या. व मराठी साहित्य, दलित साहित्य अधिकच समृध्द केले.

## संदर्भ ग्रंथ

१. Paul S.K. (२००७) Dalitism: Its Growth and Evaluation.
२. वाघमारे जनार्दन (२०१७) जनवादी साहित्यीक अण्णाभाऊ साठे, डायमंड पब्लिकेशन, पुणे.